जा. क्र. प्रा/प्राशि/आप्राशा/मान्यता/पुवि/ ९९ 2049

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक :- - 6 AUG 1999

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर

प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका
प्राथमिक शिक्षण मंडळ, पुणे/पिंपरी चिंचवड/सोलापूर/ता. पंढरपूर, जि. सोलापूर/ता. महाड जि. रायगड

विषय :- सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत. माध्यम - मराठी.

संदर्भ :- शालेय शिक्षण विभागाकडील शासननिर्णय क्रमांक : व्हाएसएच- १०९९/[२६० ] प्राशि-३, दिनांक - ६.७.९९, ८.७.९९, ९.७.९९

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणांस कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव. | शाळेचे ठिकाण. | माध्यम. |
|---|---|---|---|
| | सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे. | | |

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहीत नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झाले नंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे / न देणे या बाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

[१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा फक्त मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

[२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

[४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

[५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

दा.ता.
10/8/99
जनरल सेक्रेटरी
श्री नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ
मळेगांव ता. बार्शी, जि. सोलापूर

[६] संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.

[७] शासनाची मंजुरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु.१००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

[८] संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

[९] संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

[१०] सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देताना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येचा प्रत्यक्ष तपासणी करुन मान्यता प्रदान करावी.

[११] सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडा संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु.१०/- च्या स्टॅम्प पेपरवर तसे हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

१२] शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. १०/- च्या स्टॅम्प पेपरवर तसे हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

[१३] संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे, त्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

[१४] संस्थेकडून रुपये - २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम स्वरुपी विना-अनुदान तत्वावर माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.

वरील सर्व अटींच्या पूर्ततेचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेनंतरच पुढील आदेश निर्गमित केले जातील.

स्थळ प्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रत :

१] मा. अवर सचिव,
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई-३२ यांचेकडे माहितीस्तव सविनय सादर.

२] मा. शिक्षण संचालक,
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-१ यांचेकडे माहितीस्तव सविनय सादर.

प्रति:

३] सचिव/अध्यक्ष,
संबंधित संस्था. ..........सोबत यादी जोडली आहे